जनसंपर्क कक्ष
0 2 JUL 2026 लोकसत्ता शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरात आज 'पूर संकटा'वर राष्ट्रीय कार्यशाळा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये उद्या (गुरुवारी) पूर परिस्थिती प्रतिमान (मॉडेलिंग) विषयावरील राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. देशभरातील संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी, अभियंते, जलसंपदा तज्ज्ञ तसेच भू-अवकाशीय तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी ती उपयुक्त ठरणार आहे.

हवामान बदल, अतिवृष्टी आणि वाढते शहरीकरण यांमुळे पूर परिस्थितीचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे होत आहे. संभाव्य पूरग्रस्त क्षेत्रांचा अंदाज घेणे, पूर व्यवस्थापनाचे प्रभावी नियोजन करणे आणि आपत्ती जोखीम कमी करण्यासाठी संगणकीय तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक बनले आहे.

या पार्श्वभूमीवर भूगोल अधिविभाग, हवामान बदल व शाश्वतता अध्ययन केंद्र, अक्वास्फिअर क्लब आणि सिग्मा इन्फ्राप्लॅन इंजिनिअरिंग प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत आयोजित कार्यशाळेत पूर परिस्थितीचे वैज्ञानिक विश्लेषण, नदी प्रवाहाचे संगणकीय अनुकरण, पूर क्षेत्रांचे नकाशीकरण आणि पूर व्यवस्थापनासाठी वापरल्या जाणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती तसेच पूर परिस्थिती मॉडेलिंगचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामध्ये डिजिटल उंची नमुना, नदी प्रवाह माहिती, पूर अनुकरण प्रक्रिया, पूर विस्तार नकाशे तयार करणे तसेच विविध पूर परिस्थितींचे विश्लेषण यांसारख्या बाबींचा समावेश असेल.

अमेरिकेतील पर्ड्यू विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. वेंकटेश मेरवाडे प्रमुख मार्गदर्शक आहेत. राष्ट्रीय जलविज्ञान संस्था, प्रादेशिक केंद्र, बेळगाव येथील शास्त्रज्ञ डॉ. अभिलाष आर. हे तांत्रिक मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती संयोजक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी दिली.

0 2 JUL 2026

सकाळ

# अध्यापक महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. साळी



डॉ. अजय साळी

कोल्हापूर : येथील महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्यपदी डॉ. अजय भगवान साळी यांची नियुक्ती झाली आहे. ते सध्या शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखेच्या अधिष्ठातापदी कार्यरत आहेत. या शासकीय अध्यापक महाविद्यालयात नोव्हेंबर २०२० पासून डॉ. साळी प्राध्यापकपदी कार्यरत आहेत. त्यापूर्वी त्यांनी परभणी येथील शासकीय अध्यापक महाविद्यालयात काम केले आहे. बुलढाणा येथील शासकीय अध्यापक महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्यपदी ते कार्यरत होते. कोल्हापूर आणि जळगाव विभागीय उच्च शिक्षण सहसंचालकपदाची जबाबदारी त्यांनी सांभाळली आहे.

0 2 JUL 2026
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात बी.एस्सी., बी.एड. प्रवेश कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात चार वर्षीय एकात्मिक बी.एस्सी. बी.एड. (आयटीइपी) प्रवेश प्रक्रियेसंदर्भात समुपदेशन सत्र झाले. इच्छुक विद्यार्थी व पालकांना प्रवेश प्रक्रियेविषयी अचूक, अद्ययावत व सविस्तर माहिती मिळावी, या उद्देशाने या ऑनलाईन समुपदेशन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी विद्यार्थ्यांना (आयटीइपी) अभ्यासक्रमाचे महत्त्व, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत या अभ्यासक्रमाची उपयुक्तता तसेच शिक्षक, वैज्ञानिक, संशोधक म्हणून उपलब्ध असलेल्या भविष्यातील संधी कमवा व शिका योजना, उच्च शिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या पर्याय एनएसएस, एनसीसी, स्पोर्ट्सच्या विविध संधी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यानंतर बी.एस्सी. बी.एड (आयटीइपी) अभ्यासक्रमाच्या समन्वयक डॉ. रुपाली संकपाळ यांनी विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया, पात्रता निकष, आवश्यक कागदपत्रे, गुणवत्ता यादी, ऑनलाईन अर्ज प्रक्रिया, प्रवेश निश्चितीची पद्धत, शुल्क, वसतिगृह योजना तसेच प्रवेश प्रक्रियेदरम्यान घ्यावयाची काळजी याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांना सातत्याने मार्गदर्शन व आवश्यक सहकार्य उपलब्ध करुन देण्यात येईल, अशी ग्वाही दिली.

02 JUL 2026

सिंधुदुर्ग समाचार

# शिक्षणशास्त्र अधिविभागात बी.एस्सी. बी.एड. प्रवेश प्रक्रियेसंदर्भात समुपदेशन

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात शनिवारी (दि. २७) चार वर्षीय एकात्मिक बी.एस्सी. बी.एड. (ITEP) प्रवेश प्रक्रियेसंदर्भात समुपदेशन सत्र झाले.

इच्छुक विद्यार्थी व पालकांना प्रवेश प्रक्रियेविषयी अचूक, अद्ययावत व सविस्तर माहिती मिळावी, या उद्देशाने या ऑनलाईन समुपदेशन सत्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी उपस्थित विद्यार्थी व पालकांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांना ITEP अभ्यासक्रमाचे महत्त्व, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP - 2020) अंतर्गत या अभ्यासक्रमाची उपयुक्तता तसेच शिक्षक, वैज्ञानिक, संशोधक म्हणून उपलब्ध असलेल्या भविष्यातील संधी कमवा व शिका योजना, उच्च शिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या पर्याय एनएसएस, एनसीसी, स्पोर्ट्सच्या विविध संधी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

यानंतर बी.एस्सी. बी.एड (ITEP) अभ्यासक्रमाच्या समन्वयक डॉ. रुपाली संकपाळ यांनी विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया, पात्रता निकष, आवश्यक कागदपत्रे, गुणवत्ता यादी, ऑनलाईन अर्ज प्रक्रिया, प्रवेश निश्चितीची पद्धत, शुल्क, वसतिगृह योजना तसेच प्रवेश प्रक्रियेदरम्यान घ्यावयाची काळजी याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांना सातत्याने मार्गदर्शन व आवश्यक सहकार्य उपलब्ध करुन देण्यात येईल, अशी ग्वाही दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 2 JUL 2026

वर्तमान

# मोत्यांच्या शेतीसाठीच्या अभिनव टाकीच्या डिझाईनला पेटंट

कोल्हापूर/प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभा2गाने विकसित केलेल्या 'गोड्या पाण्यातील मोती शेतीसाठीच्या टाकीच्या डिझाईन'ला नुकतेच भारत सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे. 'प्रयोगशाळेपासून शेतीपर्यंत' या प्रकारचे संशोधन करणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्रज्ञांना हे यश मिळाले आहे.

विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील डॉ. नितीन कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करणाऱ्या साक्षी श्रीकांत ढेकणे, विशाल संभाजी सुतार आणि दिलीप आनंदराव कांबळे यांच्या संशोधनकार्याचे हे फलित आहे.

भारतामध्ये गोड्या पाण्यातील मोती शेतीला मोठी संधी उपलब्ध असून, त्यासाठी आवश्यक असलेले नियंत्रित आणि नैसर्गिक वातावरण निर्माण करणे हे मोठे आव्हान मानले जाते. शिवाजी विद्यापीठाने दोन वर्षांपूर्वी प्राणीशास्त्र अधिविभागात गोड्या पाण्यातील मोत्यांच्या शेतीचा प्रकल्प हाती घेऊन तो प्रमाणाबाहेर यशस्वी करून दाखविला आहे. आता या प्रकल्पाअंतर्गत विविध बाबींचा सूक्ष्म अभ्यास करून हा प्रयोग अधिकाधिक यशस्वी करण्याच्या दृष्टीने संशोधनाची दिशा केंद्रित केली आहे. याचाच भाग म्हणून या संशोधकांनी मोत्यांच्या शेतीसाठी आवश्यक अशा वैज्ञानिक निकषांनुसार दोन परस्पर जोडलेल्या टाक्यांची अभिनव रचना विकसित केली आहे.

**टाकीची रचना व महत्त्व**

या टाकीच्या डिझाईनमध्ये






दोन वेगवेगळ्या आकारांच्या परस्पर जोडलेल्या टाक्यांचा समावेश आहे. पहिल्या टाकीतील सबमर्सिबल पंपाद्वारे पाणी दुसऱ्या टाकीत सतत प्रवाहित केले जाते. दुसऱ्या टाकीत विशेष पाईपलाइन आणि स्प्रिंकलर प्रणाली बसविण्यात आली असून त्यामुळे पाण्यात नैसर्गिक नदीप्रवाहासारख्या




लहरी निर्माण होतात. छतावरील स्प्रिंकलर्समधून नियंत्रित वेगाने होणारा पाण्याचा शिडकावा कृत्रिम पावसासारखे वातावरण तयार करतो. या अखंड ज ल प रि भ्र म णा मु ळे पाण्यातील विरघळलेल्या प्राणवायूचे प्रमाण, तापमान, पीएच आणि एकूण पाण्याची गुणवत्ता दीर्घकाळ संतुलित राहते. परिणामी मोती उत्पादनासाठी वापरण्यात येणाऱ्या शिंपल्यांना नैसर्गिक अधिवासासारखे पोषक वातावरण उपलब्ध होते. या अभिनव टाकीच्या माध्यमातून एकदाच भरलेले पाणी १५ ते १८ महिन्यांपर्यंत गुणवत्तेत कोणताही लक्षणीय बदल न होता वापरणे शक्य झाल्याचे या संशोधनातून सिद्ध झाले आहे. ही रचना केवळ मोती शेतीसाठीच नव्हे, तर संशोधन, शिक्षण, जैवविविधता संवर्धन आणि कृषीपूरक उद्योगांसाठीही उपयुक्त ठरणार आहे. प्रा णी शा स्त्र अधिविभागात विकसित झालेल्या या तंत्रज्ञानामुळे भविष्यात शेतकरी, संशोधक तसेच लघु व मोठ्या उद्योजकांना मोती उत्पादनाचा पर्यायी व्यवसाय विकसित करण्यासाठी मोठी मदत होणार आहे. यासाठी अधिविभागाची संशोधक विद्यार्थिनी साक्षी ढेकणे हिने भुवनेश्वर (ओडिशा) येथील आयसीएआर-सीआयएफए (सेंट्रल इन्स्टिट्यूट फॉर फ्रेशवॉटर एक्वाकल्चर) येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षणही घेतले आहे.

**'कृषीपूरक उद्योग म्हणून विकासाची क्षमता'**

या संदर्भात डॉ. नितीन कांबळे यांनी सांगितले की, या पेटंटमुळे शिवाजी विद्यापीठाच्या संशोधनाधारित तंत्रज्ञान विकसित करण्याच्या क्षमतेची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेली आहे. हे संशोधन भविष्यात तंत्रज्ञान हस्तांतरण (Technology Transfer) आणि व्यावसायिकीकरणासाठीही महत्त्वपूर्ण ठरणार आहे. पारंपरिक शेतीला पूरक व्यवसाय म्हणून गोड्या पाण्यातील मोती शेतीकडे शेतकरी वळू शकतात. कमी देखभाल खर्च, कमी वीज वापर आणि नियंत्रित जलव्यवस्थापनामुळे हे तंत्रज्ञान ग्रामीण भागात रोजगार व उत्पन्नवाढीसाठी उपयुक्त ठरण्याची क्षमता आहे.

**'लॅब टू लँड' संकल्पनेला मूर्त रुप देणारे संशोधनः कुलगुरू डॉ. कामत**

या संदर्भात संशोधकांचे अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. राजनीश कामत म्हणाले की, शिवाजी विद्यापीठात समाजोपयोगी आणि उद्योगाभिमुख संशोधनाला सातत्याने प्रोत्साहन दिले जात आहे. या पेटंटमुळे संशोधनाचे रूपांतर प्रत्यक्ष तंत्रज्ञानात करण्याच्या आमच्या प्रयत्नांना बळ मिळाले असून, शेतकरी व उद्योजकांसाठी नवीन संधी उपलब्ध होतील. संशोधन, नवोपक्रम आणि समाजोपयोगी तंत्रज्ञान विकासाच्या दिशेने शिवाजी विद्यापीठाने टाकलेले हे आणखी एक महत्त्वाचे पाऊल असून, 'प्रयोगशाळेतील संशोधन ते शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत' या संकल्पनेला मूर्त रूप देणारे हे पेटंट आहे.

गोड्या पाण्यातील मोती शेतीसाठीच्या टाकीची वैशिष्ट्ये-

* दोन परस्पर जोडलेल्या वैज्ञानिक पद्धतीने डिझाइन केलेल्या टाक्या
* सतत पाणी परिभ्रमण, कृत्रिम लहरी आणि पावसासारखा शिडकावा
* पाण्यातील विरघळलेल्या प्राणवायूचे प्रमाण वाढविणारी रचना
* तापमान, पीएच व पाण्याची गुणवत्ता दीर्घकाळ स्थिर ठेवण्याची क्षमता
* नैसर्गिक नदीसदृश परिसंस्था निर्माण करणारे डिझाईन
* कमी वीज वापर आणि कमी देखभाल खर्च
* सर्व ऋतूंमध्ये वापरण्यास सुलभ रचना
* संशोधन, शिक्षण व व्यावसायिक मोती शेतीसाठी उपयुक्त तंत्रज्ञान.

या संशोधनाचे फायदे-


* मोती उत्पादनासाठी वापरण्यात येणाऱ्या शिंपल्यांचे आरोग्य सुधारते.
* मृत्यूदरात लक्षणीय घट होते.
* उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होते.
* पाण्याची गुणवत्ता दीर्घकाळ टिकून राहते.
* अमोनियाचे प्रमाण नियंत्रित राहते.
* नैसर्गिक परिसंस्थेचे संवर्धन होते.
* रोगांचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते.
* शेतकरी, संशोधक आणि उद्योजकांसाठी किफायतशीर तंत्रज्ञान.
* कृषीपूरक व्यवसाय म्हणून मोती शेतीला चालना मिळणार.

0 2 JUL 2026

आरडंर व्हयू

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्कूल ऑफ इंजिनिअरिंगमध्ये अभियांत्रिकी प्रवेश मार्गदर्शन सत्राला उदंड प्रतिसाद



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथे प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशासाठी 'केंद्रीय प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन व चर्चासत्राला विद्यार्थी आणि पालकांचा उदंड प्रतिसाद लाभला.

एमएच-सीईटी २०२६ मध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना केंद्रीय प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील अचूक, अद्ययावत व सविस्तर माहिती मिळावी, या उद्देशाने २७ जून रोजी या मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले.

यावेळी स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे प्रभारी संचालक डॉ. अजित कोळेकर यांनी सांगितले की, योग्य माहिती आणि योग्य निर्णय यांच्या आधारे विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसार, गुणवत्तेनुसार आणि करिअरच्या उद्दिष्टांनुसार महाविद्यालय व शाखेची निवड करावी. अभियांत्रिकी क्षेत्रामध्ये देश-विदेशात करिअरच्या अनेक संधी उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने पुढे जाणे अपेक्षित आहे. त्या दृष्टीने स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमध्ये पदवी स्तरावर कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, फूड टेक्नॉलॉजी, केमिकल इंजिनिअरिंग, सिव्हिल इंजिनिअरिंग आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग या शाखांमध्ये शिक्षण दिले जाते. तसेच पदव्युत्तर स्तरावर कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, फूड टेक्नॉलॉजी, एनर्जी टेक्नॉलॉजी आणि एन्व्हायर्नमेंटल सायन्स अँड टेक्नॉलॉजी या शाखांमध्ये अभ्यासक्रम उपलब्ध असून अभियांत्रिकीच्या विविध शाखांमध्ये पीएच. डी. अभ्यासक्रमाची सुविधाही उपलब्ध आहे.

प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल अधिकारी तथा केंद्रीय प्रवेश प्रक्रिया तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. गणेश पाटील यांनी विद्यार्थ्यांना सुमारे दीड तास सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी केंद्रीय नोंदणी प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, गुणवत्ता यादी, पर्याय फॉर्म भरण्याची योग्य पद्धत, च्या विविध फेऱ्या, महाविद्यालय व शाखा निवडीचे निकष, प्रवेश निश्चिती प्रक्रिया, शुल्क, शिष्यवृत्ती योजना तसेच विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेदरम्यान घ्यावयाची काळजी याविषयी सविस्तर माहिती दिली.

यासोबतच भविष्यातील रोजगाराच्या संधी, उच्च शिक्षणाच्या संधी, विविध शिष्यवृत्ती योजना, विद्यापीठाच्या विविध विद्यार्थी कल्याणकारी योजना, सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेली फी सवलत व मोफत वसतिगृह योजना, तसेच प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे आणि प्रवेश प्रक्रियेचे संपूर्ण स्वरूप याविषयीही विद्यार्थी व पालकांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

मार्गदर्शन सत्रानंतर प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थी व पालकांच्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील विविध शंकांचे निरसन करण्यात आले. अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेबाबत सखोल मार्गदर्शन मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले. प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांना सातत्याने मार्गदर्शन व आवश्यक सहकार्य उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन प्रथम वर्ष प्रवेश समन्वयक डॉ. महेश साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणीमध्ये डॉ. विश्वास पाटील यांनी विशेष पुढाकार घेतला. डॉ. वैशाली सावंत, डॉ. अमर डूम, डॉ. चेतन आवटी आणि डॉ. श्रीपाल गायकवाड यांनी परिश्रम घेतले. डॉ. हर्षवर्धन पंडित यांनी आभार मानले.

0 2 JUL 2026

जनप्रवास

# विद्यापीठ परीक्षेचे आजअखेर ८१० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**जनप्रवास : कोल्हापूर**



शिवाजी विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल -२०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा १ एप्रिलपासून व्यवस्थितपणे सुरु झालेल्या आहेत. आज १ जुलैरोजी विविध १३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ३२ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी ३२१० विद्यार्थी उपस्थित होते. १ जुलैरोजी विविध ३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आलेले असून आजअखेर ८१० अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आलेले आहेत.

0 2 JUL 2026
तरुण भारत

# पदवी, पदव्युत्तर ८१० अभ्यासक्रमांचे निकाल

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील बुधवार दि.१ रोजी ३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले असून आजअखेर ८१० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. बुधवारी विविध १३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ३२ परीक्षा केंद्रावर पार पडल्या असून सदर परीक्षेसाठी ३२१० विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

0 2 JUL 2026

तरुण भारत


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यार्थ्यांकडे ज्ञानासह कौशल्ये, तंत्रज्ञानाची जाण, व्यावसायिक दृष्टीकोन, संशोधनवृत्ती व बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमतेची गरज आहे. या सर्व बदलांचा विचार करून भारत सरकारने लागू केलेले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण केवळ अभ्यासक्रमातील बदल नसून भारतीय शिक्षण व्यवस्थेला आधुनिक, लवचिक, उद्योगाभिमुख आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनविण्याचा व्यापक आराखडा आहे. या धोरणामुळे बदलत्या वाणिज्य शिक्षणाला नवी दिशा मिळत आहे. यामध्ये अनेक संधी निर्माण झाल्या असून विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला पाहिजे.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

## वाणिज्य विद्याशाखेसाठी वरदान

• डॉ. सुशांत माने,
समन्वयक, शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर



- वाणिज्य क्षेत्रातील बदलत्या रोजगार स्वरूपासाठी सक्षम
- रोजगारासह स्वत:च्या व्यवसायात करिअरच्या अनेक
- कौशल्य, तंत्रज्ञान, व्यावसायिक दृष्टीकोन, संशोधनवृत्तीची गरज
- बहुविषयक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास
- विद्यार्थ्यांसाठी नव्या पर्वाची सुरुवात
- आंतरराष्ट्रीय स्तरावर नोकरी, रोजगाराची संधी

विशेषत: वाणिज्य विद्याशाखेच्या दृष्टीने हे धोरण अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले आहे. आजचा वाणिज्य विद्यार्थी केवळ लेखापाल किंवा बँक कर्मचारी म्हणून नव्हे, तर आर्थिक विश्लेषक, डेटा विश्लेषक, वित्तीय सल्लागार, उद्योजक, व्यवस्थापक आणि जागतिक उद्योगक्षेत्रात कार्य करणारा व्यावसायिक म्हणून घडण्याची क्षमता बाळगतो. या सर्व शक्यता राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे अधिक बळकट झाल्या आहेत. डिजिटल क्रांती, स्टार्टअप संस्कृती, कृत्रिम बुद्धिमत्ता, वित्तीय तंत्रज्ञान, जागतिक व्यापार, ई-कॉमर्स, डिजिटल पेमेंट व्यवस्था आणि उद्योगक्षेत्रातील सातत्याने होत असलेल्या बदलामुळे रोजगाराचे स्वरूपही झपाट्याने बदलत आहे. या बदलत्या परिस्थितीत केवळ पारंपरिक शिक्षण पुरेसे राहिलेले नाही.

### बदलत्या वाणिज्य शिक्षणाला नवी दिशा

पूर्वी वाणिज्य शिक्षणाचा मुख्य भर लेखाशास्त्र, बँकिंग, व्यापार, अर्थशास्त्र आणि करप्रणाली या पारंपरिक विषयांवर होता. त्या काळातील उद्योगांच्या गरजांनुसार ही रचना योग्य होती. परंतु गेल्या दोन दशकांत जागतिक अर्थव्यवस्थेत मोठे बदल झाले आहेत. आज प्रत्येक आर्थिक व्यवहार डिजिटल माध्यमातून होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा ॲनालिटिक्स, क्लाऊड कॉम्प्युटिंग, ब्लॉकचेन, फिनटेक, डिजिटल बँकिंग आणि ई-कॉमर्स यांनी व्यवसायाचे स्वरूप पूर्णपणे बदलून टाकले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने या बदलांची योग्य दखल घेत वाणिज्य शिक्षण अधिक आधुनिक आणि भविष्याभिमुख बनविले आहे. त्यामुळे विद्यार्थी केवळ पदवीधर न राहता आधुनिक उद्योगविश्वासाठी आवश्यक असलेले ज्ञान आणि कौशल्ये आत्मसात करू शकतात.

### अनुभवाधारित शिक्षणामुळे वाढणारी गुणवत्ता

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने सैद्धांतिक शिक्षणासह अनुभवाधारित शिक्षणावर भर दिला आहे. वाणिज्य शिक्षणात आता केस स्टडी, उद्योगभेटी, इंटर्नशिप, ऑन-द-जॉब ट्रेनिंग, प्रकल्पाधारित शिक्षण, वित्तीय विश्लेषण आणि व्यवसाय समस्यांवरील अभ्यास यांचा समावेश होत आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगातील कामकाज समजते. केवळ पुस्तकातील संकल्पना न शिकता त्या प्रत्यक्ष व्यवहारात कशा वापरल्या जातात याचा अनुभव मिळतो. त्यामुळे त्यांची विश्लेषण क्षमता, नेतृत्वगुण आणि निर्णयक्षमता अधिक विकसित होते.

### बहुविषयक शिक्षण : आधुनिक वाणिज्य शिक्षणाचा पाया

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील सर्वात महत्त्वाची संकल्पना म्हणजे बहुविषयक शिक्षण (मल्टीडिसिप्लेनरी एज्युकेशन). आज उद्योगांना एका विषयाचे मर्यादित ज्ञान असलेले कर्मचारी नको आहेत. त्यांना वित्त, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, कायदा, संवादकौशल्य आणि डेटा विश्लेषण यांचे एकत्रित ज्ञान असलेले व्यावसायिक आवश्यक आहेत. यामुळे वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना आता संगणकशास्त्र, डेटा सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, व्यवसाय विश्लेषण, व्यवस्थापन, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, परकीय भाषा व कायदा आदी विषय शिकण्याची संधी मिळत आहे. या बहुविषयक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास होतो, निर्णयक्षमता वाढते व व्यवसायातील गुंतागुंतीच्या समस्यांचे विश्लेषण करण्याची क्षमता विकसित होते.

### कौशल्यधारीत अभ्यासक्रमाला स्थान

उद्योगाभिमुख आणि कौशल्याधारित शिक्षण आजचा उद्योग केवळ गुणपत्रिका पाहून कर्मचारी निवडत नाही. त्याला प्रत्यक्ष काम करू शकणारे, डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करणारे आणि बदलत्या परिस्थितीत योग्य निर्णय घेणारे कर्मचारी आवश्यक असतात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने हीच गरज लक्षात घेऊन वाणिज्य शिक्षणात कौशल्याधारित अभ्यासक्रमाला विशेष स्थान दिले आहे.

### डिजिटल अर्थव्यवस्थेसाठी सक्षम विद्यार्थी

भारत डिजिटल अर्थव्यवस्थेकडे वेगाने वाटचाल करत आहे. आज बँकिंग, करप्रणाली, व्यवसाय व्यवहार, गुंतवणूक, लेखांकन आणि ग्राहक सेवा या सर्व क्षेत्रांमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे 'वाणिज्य विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञानाशी परिचित होण्याची संधी मिळत आहे.

ऑनलाइन शिक्षण, ई-कंटेंट, व्हर्च्युअल क्लासरूम, डिजिटल लायब्ररी, ऑनलाइन मूल्यांकन आणि लर्निंग नेजमेंट सिस्टिममुळे शिक्षण अधिक प्रभावी, सुलभ व गुणवत्तापूर्ण झाले आहे. डिजिटल तंत्रज्ञानाची ओळख झाल्यामुळे विद्यार्थी बदलत्या उद्योगव्यवस्थेत सहजपणे काम करू शकतात.

### रोजगारासह स्वत:च्या व्यवसायात करीअर

त्यामुळे विद्यार्थ्यांना Tally Prime, GST, Income Tax, Advanced Excel, ERP, Financial Modelling, Data Analytics, Power BI, Digital Accounting, Artificial Intelligence, Financial Planning, Stock Market Analysis, Business Communication आणि Soft Skills यांसारख्या आधुनिक कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जात आहे. त्यामुळे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थी उद्योगासाठी तयार होतात. रोजगार मिळविण्यासह स्वत:चा व्यवसाय सुरु करण्यासाठीही त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होतो.

(पूर्वार्ध)